प्रिया सुळेंच्या कार्यशैलीवर नाराजी, विलिनीकरणाला दादा गटाच्या नेत्यांचा विरोध, राष्ट्रवादीचे काय होणार? >>पान 2

सुनेत्रा पवार शपथविधी : पार्थ पवार अन् शरद पवारांच्या भेटीनंतर कुटुंबातील गैरसमज दूर झाले : किरण गुजर >>पान 3

गुजरातला जाणारा ४० लाखांचा विदेशी मद्यसाठा जप्त >>पान 4

**सुविचार**

सवय ही एक एकनिष्ठ सेवक बनू शकते
किंवा निष्ठूर मालक बनते.– अज्ञात


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 172 ■ रविवार, दि. 01 फेब्रुवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




आलिया भट्ट सोशल मीडिया अकाऊंट डिलीट करणार? आतील पान

# मी, सुनेत्रा अजित पवार, सुनेत्रा पवारांनी घेतली शपथ

## महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान हा सुनेत्रा पवार यांना मिळाला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी आज (३१ जानेवारी) शपथ घेतली. राज्याचे प्रभारी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे काही प्रमुख नेते उपस्थित होते. अतिशय भावपूर्ण वातावरणात हा शपथविधी पार पडला. दरम्यान, सुनेत्रा पवार यांचा आगमन झाल्यानंतर उपस्थित आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अजित दादा अमर रहे, एकच वादा अजित दादा, वहिनी आप आगे बढो, हम तुम्हारे साथ है, महाराष्ट्राचा एकच दादा, अजित दादा अशा घोषणा दिल्या.







राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रीपदासाठी निवड करण्यात आली. त्यामुळं महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान हा सुनेत्रा पवार यांना मिळाला आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्रिपदाच्या शपथविधी सोहळ्यापूर्वी विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीला पक्षाचे सर्व आमदार व प्रमुख नेते उपस्थित होते. या बैठकीमध्ये सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली. यानंतर सायंकाळी ५ वाजता त्यांचा शपथविधी पार पडला.

### एकमताने राष्ट्रवादीच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड

विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ज्येष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी मांडला, तर दिलीप वळसे-पाटील यांनी त्यास अनुमोदन दिलं. त्यानंतर सुनेत्रा पवार यांची एकमतानं राष्ट्रवादीच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली. या निवडीची अधिकृत माहिती विधिमंडळ सचिवांना कळवण्यात आली.

### राज्यसभा खासदारकीचा राजीनामा

गटनेतेपदी निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा देखील राजीनामा दिला. सुनेत्रा पवार यांनी उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती सीपी राधाकृष्णन यांच्याकडे राजीनामा सोपवला. सुनेत्रा पवार यांनी २०२४ ची लोकसभा निवडणूक लढवली होती, मात्र त्यात त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर त्यांची राज्यसभेवर वर्णी लागली होती. मात्र, आता राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्यामुळं त्यांना खासदारकीचा राजीनामा द्यावा लागला आहे.

## एकहाती सत्ता आल्यानंतर सुद्धा भाजपा मित्र पक्षांना देणार महत्वाची पदं: भाजपा नगरसेवक चक्रावले

**नाशिक/प्रतिनिधी :** महानगरपालिकेत बहुमत असतानाही भाजपाच्या वतीनं मित्रपक्षांना सत्तेत सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. भाजपाचे शहराध्यक्ष सुनील केदार यांच्या या प्रस्तावामुळे भाजपाचे नगरसेवक चक्रावलेत. विशेषत: उपमहापौर आणि इतर पदं विरोधकांना जाणार असतील, तर बहुमत असूनही उपयोग काय, असा प्रश्न आता भाजपाचे नगरसेवक उपस्थित करत आहेत. यामुळे भाजपा नगरसेवकांमध्ये मोठी नाराजी पसरली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाला १२२ पैकी सर्वाधिक ७२ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे महापौर, उपमहापौर पद नव्हे, तर स्थायी समितीत भाजपाचे दहा सदस्य निवडून जाणार आहेत. महानगरपालिकेत आणखी पाच विषय समिती आहेत. त्यात सर्वाधिक संख्याबळ भाजपाचं असणार आहे. त्यामुळे या समितीमध्ये सभापतींची संधी देखील भाजपालाच मिळणार आहे. असं असताना पक्षाच्या वतीनं राष्ट्रवादी, शिवसेना भाजपाबरोबर सत्तेत एकत्र राहण्याचं आवाहन करण्यात आल्यानं भाजपा नगरसेवक बुचकळ्यात पडले आहेत.

राज्यात महायुतीत शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजपा एकत्र आहेत. मात्र नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाच्या विरोधात शिवसेना आणि राष्ट्रवादीनं युती करून एकत्रित निवडणूक लढवली. त्यामुळे भाजपाच्या अनेक उमेदवारांना पराभवाचा फटका बसला आहे. अशावेळी विरोधात लढणाऱ्यांनाच भाजपानं रेड कार्पेट टाकले असल्यानं भाजपा नगरसेवकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## स्व. अजितदादांबद्दलचे संजय राऊतांचे प्रेम हे पुतनामावशीसारखे

### भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांची प्रखर टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर लगेच उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीची इतकी घाई का केली असं विचारून प्रेमाचा कळवळा दाखवणाऱ्या संजय राऊतांचे प्रेम पुतना मावशी सारखे आहे. महाराष्ट्र शोकसागरात बुडाला असताना हिणकस वक्तव्ये करत संजय राऊतांनी स्व. अजित पवार यांचा अपमान कसा केला हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. संजय राऊतांनी दु:खामध्ये राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करू नये, असे टीकास्त्र भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी शनिवारी सोडले. या ना त्या प्रकारे सतत नकारात्मक बोलणे, अपप्रचार करणे हेच काम राऊत करत आहेत.राऊतांनी अजितदादांवर वारंवार पातळी सोडून टीका केली होती याचे स्मरणही श्री. बन यांनी करून दिले.



अजित दादा यांच्या मृत्यूनंतर लगेच उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीची इतकी घाई का केली जाते आहे, असे म्हणत भाजपावर टीका करणाऱ्या राऊतांचा खरपूस समाचार घेत श्री. बन म्हणाले की, राऊतांनी या गोष्टीमध्ये नाक खुपसण्याची गरज नाही. सत्तापदावरच्या व्यक्तीचे निधन झाल्यावर त्या पदावरील पुढील नियुक्ती ही क्रमप्राप्त असते. स्व. इंदीरा गांधी, जयललिता, मनोहर पर्रीकर यांच्या निधनानंतर लगेचच त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांचा शपथविधी झाला होता याचा दाखला देत श्री. बन यांनी राऊतांना लक्ष्य केले.

परिस्थितीनुसार कठीण प्रसंगात पक्षाच्या हितासाठी निर्णय घ्यावे लागतात. अजितदादांच्या निधनानंतर पक्ष नेता निवड, उपमुख्यमंत्री पदाचा निर्णय याबाबत अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जो निर्णय घेईल त्याला भारतीय जनता पार्टीचा पाठिंबा असेल. यामध्ये नाहक केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे नाव घेऊन यापुढील निर्णयात श्री. शाह यांचा हात असेल असे म्हणणे म्हणजे बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण आहे अशी प्रखर टीका ही श्री. बन यांनी केली. राऊतांना अजितदादांबद्दल कधीही प्रेम नव्हते, ते सातत्याने अजित पवारांचा द्वेष करायचे. अजितदादांना लोकांचे मोठ्या प्रमाणावर समर्थन मिळत होते, याबद्दल सातत्याने उद्धव ठाकरे, उबाठा गट आणि राऊतांनी त्यांचा द्वेष केला, अशी टीका श्री. बन यांनी केली. अजितदादांना लोकांनी नेहमीच भरभरून मते देत निवडून दिले होते, संजय राऊत मात्र एकदाही निवडून आले नाहीत, असा टोला श्री. बन यांनी लगावला.

## पाटील चालेल-पटेल नको, राज ठाकरेंचे रोखठोक ट्विट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर पक्षाचे, कुटुंबाचे आणि उपमुख्यमंत्रिपदाचे काय होणार? पुढची वाटचाल कशी असणार? असे प्रश्न महाराष्ट्राला पडले होते. परंतु अजित पवार यांचे पक्षातील सहकारी ज्यांना दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण नको होते, त्यांनी सुनेत्रा पवार यांच्यापुढे उपमुख्यमंत्रिपदाचा प्रस्ताव ठेवला आणि त्यांचा होकार मिळवून शरद पवार यांना मोठा शह दिला. अजित पवार यांना जाऊन ७२ तास उलटत नाही तोच सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. दुसरीकडे राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय नेतृत्वासाठी अर्थात राष्ट्रीय अध्यक्ष या पदासाठी प्रफुल पटेल स्पर्धेत असल्याची चर्चा सुरू झाली. या घडामोडी एवढ्या वेगात घडल्या की सर्वसामान्यांचे डोळेही विस्फारले. कदाचित बदललेल्या राजकारणाचा वेग याला कारणीभूत असावा. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रोखठोक ट्विट करून आपली भूमिका मांडली आहे.

राज ठाकरे यांची ओळख कट्टर मराठीप्रेमी.. मराठी भाषेसाठी काहीही करण्याची तयारी त्यांची तयारी.. परंतु राष्ट्रवादीसारख्या मराठमोळ्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी प्रफुल पटेल यांच्या नावाच्या चर्चांनी राज ठाकरे काहीसे अस्वस्थ झाले. त्यांनी मराठी माणसाचा



मुद्दा पुढे करून 'पाटील चालेल-पटेल नको' असे स्पष्ट शब्दात आपली भूमिका मांडली. ही भूमिका मांडताना राज्याच्या राजकारणाचा विचका झालाय, असे म्हणत घडत असलेल्या घडामोडींवर नारीजीही व्यक्त केली.

राज ठाकरे काय म्हणाले?

महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या काही काळात पार विचका झाला आहे त्यावर खरंतर भाष्य पण करावं असं वाटत नाही. पण तरीही आज दिवसभर ज्या घडामोडी सुरु आहेत त्यावर बोलावंच लागेल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही, असे मनसेप्रमुख राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरे यांच्या 'मनातील पाटील' कोण?

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष पटेल नको, पाटील असावा, असे राज ठाकरे म्हणाले. त्यामुळे राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदासाठी राज ठाकरे यांच्या मनातील पाटील कोण? अशी चर्चा सुरू झाली आहे.




## अजितदादांची सावली ते लाखो महिलांची माऊली; सुनेत्रा पवार यांचा प्रेरणादायी प्रवास

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांचा राजकीय वारसा पुढे कोण नेणार? असा प्रश्न संपूर्ण राज्यासमोर उभा होता. अखेर या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे. आज सायंकाळी मुंबईत सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. या नेमणुकीतून सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री बनत आहेत, हा राज्याच्या राजकारणात ऐतिहासिक टप्पा आहे.

सुनेत्रा पवार यांचं पूर्वाश्रमीचं आडनाव पाटील. त्यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९६३ रोजी धाराशिव (तत्कालीन उस्मानाबाद) येथे



झाला. त्या राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील आहेत. त्यांचे बंधू पद्मसिंह पाटील हे माजी मंत्री होते. या पार्श्वभूमीमुळे सुनेत्रा पवारांना राजकीय वारसा जन्मत:च लाभलेला आहे.

१९८५ मध्ये अजित पवार यांच्याबरोबर विवाहानंतर सुनेत्रा पवार यांनी सामाजिक कार्यात स्वत: झोकून दिलं. काटेवाडीमध्ये ग्राम स्वच्छता चळवळीची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली, ज्यामुळे संपूर्ण गाव या मोहिमेत सहभागी झालं. त्यांच्या नेतृत्वाखाली काटेवाडी गावानं राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. या कार्यामुळं देश-विदेशातील अभ्यासकांनी गावाला भेट दिली. तसंच, सार्क देशांच्या साकोसान परिषदेत सहा राष्ट्रप्रमुखांसमोर भाषण करण्याची संधीही त्यांना मिळाली.

सुनेत्रा पवार यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत. महिलांमध्ये कर्करोगाविषयी जागृती, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, वृक्षारोपण, ओढा खोलीकरण, तसेच 'एनव्हायर्नमेंट फोरम ऑफ इंडिया'च्या माध्यमातून जनजागृती या उपक्रमांमुळे त्यांनी जनतेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलं. बारामती टेक्सटाईल पार्कच्या अध्यक्षपदावरून हजारो महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला.

राजकीय जीवनातही सुनेत्रा पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अजित पवार यांच्या राजकीय वाटचालीत त्यांनी मोलाची साथ दिली; लग्नानंतर शेतकाम, पोल्ट्री व्यवसाय, गाईगुरे सांभाळणे आणि दूध काढणे अशा सर्व कामात त्यांनी सहभाग घेतला. याशिवाय, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून निवडणूक लढवली. त्यांना पराभव स्वीकारावा लागला तरी त्यांनी जनसेवा जोमाने सुरू ठेवली. नंतर राज्यसभेवर त्यांची वर्णी लागली आणि त्या राज्यसभेच्या खासदार झाल्या. राज्यसभेतील कामकाजासोबत त्यांनी तालिका अध्यक्षपदाची जबाबदारीही सांभाळली.

अजित पवार यांनी अनेक भाषणांमध्ये त्यांच्या जीवनात सुनेत्रा पवारांचा मोलाचा सहभाग असल्याचं सांगितलं. उपमुख्यमंत्री पदावर विराजमान होताच सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या राजकारणात पहिली महिला उपमुख्यमंत्री म्हणून ऐतिहासिक टप्पा गाठतील.

सुनेत्रा पवार यांचा सामाजिक आणि राजकीय प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. या निवडीला अजित पवार यांच्या निधनाची दुर्दैवी किनार आहे. मात्र, राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेऊन, त्या आज फक्त अजित पवारांचा वारसा पुढे नेत नाहीत, तर महिलांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरणार आहेत.

## विरोधकांनी राजकीय भाष्य जबाबदारीने करावे

भारतीय अर्थव्यवस्था मृत आहे आणि निवडणुकीत मतचोरी होत आहे, असे दोनच आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी सातत्याने करत आहेत. अमेरिकी आयातशुल्कावर पंतप्रधान मोदी भाष्य करत नाहीत, हा त्यांचा प्रमुख आक्षेप. तथापि, अमेरिका भारताबरोबर करार करण्यासाठी प्रयत्नशील आहे, हे ते सांगत नाहीत.अमेरिकेच्या आयातशुल्कामुळे भारतीय वस्त्रोद्योग अडचणीत आला असून, देशाची अर्थव्यवस्था मृत झाल्याचा आरोप करणे, हे राहुल गांधींचे निव्वळ राजकीय सोयीचे भाष्य. सध्या वस्त्रोद्योगावरील संकट हे जागतिक आहे, संरचनात्मक आहे आणि त्यावर उपाय घोषणांतून सापडणारे नाहीत. अमेरिकेने भारतावर लादलेले अतिरिक्त शुल्क हे द्विपक्षीय संबंधांच्या एका टप्प्यावरचे चित्र आहे. गेल्या काही वर्षांत अमेरिका त्यांचे धोरण नव्याने आखत आहे. चीनविरोधातील संघर्ष आणि निवडणूक-राजकारणाचा दबावामुळे, अमेरिकेची भूमिका अधिक आक्रमक झाली आहे. भारत हा त्यातून अपवाद राहू शकत नाही. अशावेळी वस्त्रोद्योगावर परिणाम होणार होताच. प्रश्न हा आहे की, सरकारने त्यावर काय भूमिका घेतली आणि विरोधकांनी त्यावर कसा प्रतिसाद दिला. राहुल गांधी यांनी या आयातशुल्काचा मुद्दा उचलून धरताना, पंतप्रधान मोदी यांच्या मौनावर टीका केली. वस्त्रोद्योगातील रोजगार, लघुउद्योगांची कोंडी, निर्यात घटण्याची भीती हे मुद्दे त्यांनी मांडले. मात्र, त्याच वेळी त्यांनी पुन्हा एकदा जे भारतीय अर्थव्यवस्था मृत आहे, असे म्हटले आहे, ते धादांत खोटे. अर्थव्यवस्था मृत असती, तर भारत आज जगातील वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक ठरला नसता. निर्यात, गुंतवणूक, पायाभूत सुविधा, डिजिटल व्यवहार, उत्पादन क्षेत्रातील विस्तार अशा सर्व क्षेत्रांत, भारताने काही वर्षांत मोठी झेप घेतली आहे. येणाऱ्या काळात ती जगातील सर्वांत मोठी तिसरी अर्थव्यवस्था म्हणूनही ओळखली जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर राहुल गांधींच्या वक्तव्यांत एक प्रवृत्ती दिसते. आर्थिक प्रश्न, निवडणूक प्रक्रिया, संविधानिक संस्था या सर्वच बाबींवर त्यांनी आरोप करत, संशय वाढीस लावला आहे. 'एसआयआर' प्रक्रियेवर त्यांनी केलेले आरोप याच प्रवृत्तीचा भाग ठरतात. जिथे जिथे पराभव दिसतो, तिथे मतदार कमी केले जातात, हा आरोप गंभीर याच पठडीतील. मतदारयादीत फेरफार, मतचोरी आणि निवडणूक आयोगाची भूमिका यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे, म्हणजे थेट लोकशाही प्रक्रियेवर अविश्वास दाखवणे होय. मतदारयादीचे पुनरावलोकन ही प्रक्रिया नवीन नाही. स्थलांतर, मृत्यू, दुबार नोंदी यांमुळे ती आवश्यक अशीच. असे असतानाही, प्रत्येक पुनरावलोकन म्हणजे मतचोरीचा कट आहे, असा आरोप करणे म्हणजे लोकशाही संस्थांच्या विश्वासार्हतेला धक्का देणे होय. विशेष म्हणजे, या आरोपांना पुष्टी देणारे ठोस पुरावे आजवर समोर आलेले नाहीत. राहुल गांधींच्या भाषणांमधून असे चित्र उभे राहते की, काँग्रेस पक्ष सोडला, तर देशातील कोणतीही संस्था विश्वासार्ह नाही. राजकीयदृष्ट्या या टीकेचा काही अंशी फायदा काँग्रेसला होऊ शकतो मात्र, देशाच्या संस्थात्मक आरोग्यासाठी अशी वृत्ती घातक ठरते. अशातूनच, 'अदानी उद्योगा'चा संदर्भ पुन्हा पुन्हा पुढे आणला जातो. अमेरिकेतील काही आरोप, चौकशा आणि त्यावर आधारित राजकीय हल्ले हे नवीन नाहीत. मोठ्या उद्योगसमूहांवर प्रश्न उपस्थित होणे, हे लोकशाहीत आवश्यकच आहे. तथापि, प्रत्येक चौकशीचा थेट भारताच्या राज्यकर्त्यांशी संबंध जोडणे आणि त्यावरून संपूर्ण व्यवस्थेलाच दोषी ठरवणे हा राजकीय स्वार्थाचा मार्ग आहे. या सगळ्यात एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित राहतो. तो म्हणजे अमेरिकेने लादलेले आयातशुल्क हे काही ब्रह्मवाक्य नाही. अमेरिकेने चर्चेची दारे उघडी ठेवली आहेत. हे शुल्क कमी करण्यासाठी आजही अमेरिका सकारात्मक संकेत देत आहे. भारतावर दबाव आणण्यासाठी अमेरिकेने शुल्कवाढीचा मार्ग स्वीकारला खरा. मात्र, भारत न बधल्याने आता पुन्हा एकदा अमेरिका भारताबरोबर व्यापार करार करण्याचे संकेत देत आहे. त्याचवेळी युरोपीय महासंघाबरोबर महत्त्वपूर्ण व्यापार कराराच्या दिशेने भारताची वाटचाल सुरू आहे. हा करार पूर्णत्वास गेला, तर भारतीय वस्त्रोद्योगासाठी मोठी संधी निर्माण होऊ शकते. युरोपियन बाजारपेठेत प्रवेश सुलभ होणे, शुल्ककपात आणि दीर्घकालीन निर्यातस्थैर्य हे सर्व शक्य होणार आहे. मात्र, या शक्यतांचा उल्लेख राहुल गांधींच्या वक्तव्यांत आढळत नाही. कारण संकट जितके गंभीर असल्याचे दाखवले, तर त्याचा राजकीय लाभ त्यांना अधिक मिळतो. संधींचा उल्लेख केला, तर ते काँग्रेससाठीच अडचणीचे ठरते. विरोधी पक्षाचे काम सरकारला वास्तवाशी निगडित प्रश्न विचारणे आहे, पण सातत्याने केलेले नकारात्मक भाष्य लोकशाहीसाठी हे घातक ठरते. आज भारतासमोर दोन मोठी आव्हाने आहेत. एक म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरतेतून स्वतःचा मार्ग शोधणे आणि दुसरे म्हणजे देशांतर्गत लोकशाही संस्थांवरील विश्वास टिकवणे. वस्त्रोद्योगातील संकटावर सरकार काम करत असून, निर्यातदारांसाठी मदत, बाजार विविधीकरण, तंत्रज्ञान सुधारणा आणि कामगार संरक्षण यांवर भर दिला जात आहे. पण अशावेळी विरोधकांनीची जबाबदारी अधिक वाढते.नेमके त्याचेच भान आज देशातील विरोधी पक्षाला नाही. भारतीय अर्थव्यवस्था मृत नक्कीच नाही, देशातील लोकशाहीही धोक्यात नाही. असे असताना जाणुनबुजून तिच्यावर संशय निर्माण केला जात आहे. त्यामुळे राजकीय भाष्य करताना विरोधकांनी जबाबदारी घेणे, हीच आजची गरज आहे.

# प्रिया सुळेंच्या कार्यशैलीवर नाराजी, विलिनीकरणाला दादा गटाच्या नेत्यांचा विरोध, राष्ट्रवादीचे काय होणार?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विधिमंडळाच्या गटनेतेपदी सुनेत्रा पवार यांची निवड राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी केली आहे. आता या संदर्भातील पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आलं आहे. आचार्य देवव्रत यांच्याकडून सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ देण्यात येणार आहे. याचवेळी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणासंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांकडून दोन्ही पक्षांचं विलिनीकरण व्हावं, अशी अजित पवारांची इच्छा होती, असं सांगितलं जात असलं तरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या मंत्री आणि आमदारांचा विलिनीकरणाला विरोध असल्याचं



सूत्रांच्यावतीनं सांगण्यात आलं आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांची सुप्रिया सुळेंच्या कार्यशैलीवर नाराजी असल्याची माहिती आहे. विलिनीकरणाच्या चर्चांना ब्रेक लागावा, अशी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची भूमिका आहे.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि मंत्री यांची भूमिका विलिनीकरणाच्या विरोधात असल्याची माहिती आहे. एकीकडे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या नेत्यांकडून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र यावेत, अशी भूमिका मांडली जात असताना अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून वेगळी भूमिका घेतली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि आमदार प्रामुख्यानं सुप्रिया सुळे यांच्यावर नाराज असल्याचं सूत्रांच्यावतीनं सांगण्यात आलं आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची विलिनीकरणाच्या चर्चावर पूर्णविराम लागावा, अशी अपेक्षा असल्याचं माहिती सूत्रांच्याकडून देण्यात आली आहे.

सुनेत्रा पवार यांचा थोड्याच वेळात शपथविधी

सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आमदारांनी विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली आहे. या संदर्भातील पत्र राष्ट्रवादी काँग्रेसकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं पत्र राज्यपाल आचार्य देवव्रत यांना देण्यात आलं आहे. आता राज्यपाल आचार्य देवव्रत सुनेत्रा पवार यांना मंत्रिपदाची शपथ ५ वाजता देणार असल्याची माहिती आहे. उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार तातडीने बारामतीला रवाना होणार असल्याची माहिती आहे. अजित पवारांचा दहावा होई पर्यंत सुनेत्रा पवार बारामतीमध्येच थांबणार आहेत. सुनेत्रा पवार दुखवटा संपे पर्यंत नेते कार्यकर्त्यांना तर भेटणार मात्र कोणतेही हार-तुरे स्वीकारणार नसल्याची माहिती आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस प्राटी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांनी अजित पवार यांच्याकडून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र व्हायला पाहिजेत अशी भूमिका घेतली होती. म त्र, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून सध्या विलिनीकरणाच्या चर्चांना ब्रेक लागावा अशी भूमिका घेतली जात असल्याचे दिसून येतेय.

## लज्जास्पद! मॉर्निंग वॉकसाठी गेलेली ४३ वर्षीय महिला; २ तरुण जवळ आले अन् नको ते केलं, पुण्यात धक्कादायक घटना

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी** : विद्येचे माहेरघर आणि सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहरात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बाणेरसारख्या उच्चभ्रू परिसरात प्रजासत्ताक दिनाच्या पहाटे मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या एका ४३ वर्षीय महिलेसोबत धक्कादायक प्रकार घडला. दुचाकीवरून आलेल्या दोघांनी म हिलेसोबत अील कृत्य केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला बाणेर परिसरात वास्तव्यास आहे. २६ जानेवारी रोजी सकाळी साडेपाचच्या सुमारास ही महिला आपल्या मैत्रिणीसोबत फिरण्यासाठी बाहेर पडली होती. बाणेर रस्त्यावरून जात असताना, एका दुचाकीवरून दोन तरुण तिथे आले. त्यांनी मुद्दाम महिलेचा पाठलाग करत तिच्याशी लज्जास्पद आणि अील कृत्य केलं. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे महिला हादरून गेली.

कृत्य केल्यानंतर आरोपींनी दुचाकीचा वेग वाढवला आणि तेथून पळ काढला. पीडित महिलेने याप्रकरणी तातडीने बाणेर पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अील कृत्य आणि विनयभंगाच्या कलमान्वये दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बाणेर पोलीस आता परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत असून, आरोपींची ओळख पटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

बाणेर, बालेवाडी यांसारख्या वर्दळीच्या आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या भागात पहाटेच्या वेळी अशा घटना घडत असल्याने महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ''पहाटेच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी,'' अशी मागणी आता नागरिक करत आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक झरेकर करत आहेत.

## माणसापेक्षा खुर्चीला महत्त्व, सुनेत्रा पवार यांचा शपथविधी आणि राष्ट्रवादीच्या घडामोडींवर शिंदे गटाची टीका

**मुंबई/प्रतिनिधी** : ''गेल्या दोन दिवसांतील राजकीय घडामोडी पाहता, राजकारणात माणसापेक्षा खुर्ची महत्त्वाची आहे असं दिसतंय. माणसापेक्षा खुर्ची जिंकली आहे. सार्वजनिक जीवनात खुर्ची जिंकली आणि माणूस हरला आहे. सर्वसामान्य लोकांना या गोष्टी भावत नाहीत. तीन दिवसांचा शासकीय दुखवटा सुरु असताना हे होतंय. थोडा कालावधी जायला हवा होता'', अशा शब्दात शिंदे सेनेचे नेते (राज्याचे सामाजिक न्याय मंत्री) संजय शिरसाट यांनी राज्यात सुरु असलेल्या राजकीय घडामोडींवर नाराजी व्यक्त केली.

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आज सायंकाळी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. याबाबत वेगाने घडामोडी घडत असताना संजय शिरसाट यांनी यासह विविध विषयांवर पत्रकार परिषदेत भाष्य केले.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या प्रक्रियेत खंड पडेल

''अजित पवार राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा होते. त्यांच्या निर्णयाविरोधात जाण्याची त्यांना क्रॉस करण्याची ताकद कोणत्याही नेत्यात नव्हती. शरद पवार किंवा इतर नेत्यांशी अजित पवारांच्या झालेल्या बैठकीत कोणताही निर्णय झाला असता तर, तो सर्वांनी मान्यही केला असता. पण आता परिस्थिती बदलली आहे.

## लेक वाचवा : लिंगगुणोत्तर समतोलासाठी कायदा,समाज आणि आपण

धाराशिव जिल्हा हा ''बेटी बचाओबेटी पढाओ'' या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असून, निती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा उपक्रमांतर्गत विशेष लक्ष दिला जाणारा जिल्हा आहे.निती आयोगाच्या महत्त्वाच्या निर्देशांकांपैकी लिंगगुणोत्तर हा एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक निर्देशांक आहे.मात्र गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यात मुलींच्या जन्माचे प्रमाण सातत्याने घटत असल्याचे चित्र दिसून येत आहे.ही बाब अत्यंत चिंताजनक असून, भविष्यात असेच लिंगगुणोत्तर घटत राहिल्यास समाजात मुला-मुलींमध्ये गंभीर असमतोल निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्ह्यात लिंगगुणोत्तर समतोल राखणे हे अत्यावश्यक बनले आहे.गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निवड प्रतिबंध) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र ( गर्भलिंग निवड प्रतिबंध) कायदा अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. लिंगगुणोत्तर वाढविणे तसेच गर्भलिंग निदान व बेकायदेशीर गर्भपात रोखण्यासाठी जिल्ह्यातील सर्व सोनोग्राफी केंद्र चालक,गर्भपात केंद्र चालक,खाजगी व शासकीय स्त्रीरोगतज्ज्ञ,, , तसेच सर्व शासकीय व खाजगी डॉक्टर यांच्यासाठी कार्यशाळा व बैठका वेळोवेळी आयोजित करण्यात येत आहेत.

तालुकास्तरावर व प्राथमिक आरोग्य केंद्र पातळीवर अंगणवाडी सेविका, एएनएम व आशा कार्यकर्ती यांच्या संयुक्त बैठका घेण्यात येत आहेत. गावनिहाय लिंगगुणोत्तराची माहिती संकलित केली जात असून जिल्ह्यातील प्रत्येक सोनोग्राफी व एमटीपी केंद्रांची त्रैमासिक तपासणी केली जाते.आवश्यकतेनुसार क्रॉस इन्स्पेक्शन करण्यात येते तसेच गुप्त पद्धतीने बनावट रुग्ण पाठवून गर्भलिंग निदान होत आहे का, याचीही काटेकोर तपासणी केली जाते.

**आपण आपल्या कार्यक्षेत्रात काय करू शकतो**

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र गर्भलिंग निवड प्रतिबंध) कायदा या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक सोनोग्राफी केंद्र कायद्यातील नियम व तरतुदी पाळत आहे की नाही,यावर देखरेख ठेवण्यासाठी समुचित अधिकारी व सल्लागार समित्या कार्यरत आहेत.या यंत्रणांना निर्भयपणे काम करता यावे यासाठी सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे.

समाजात मुलींची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यासाठी विविध सभांमधून प्रबोधन करता येईल.या समस्येच्या मुळाशी असलेल्या पुरुषप्रधान मानसिकता,पैशाच्या हव्यासातून होणारे गैरप्रकार यावर स्पष्टपणे चर्चा करणे गरजेचे आहे. प्रभाग व गाव पातळीवर लिंगनिहाय जन्मनोंदणीची पडताळणी करून उपलब्ध माहिती सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करता येईल.




प्रसारमाध्यमांचा सहभाग घेऊन जनजागृती अधिक प्रभावीपणे करता येईल. गावातील महिला मंडळे, युवक मंडळे यांचा सहभाग घेऊन ''मुलगाच हवा'' ही मानसिकता बदलण्यासाठी विशेष प्रयत्न करता येतील.गर्भलिंग निवडीशी संबंधित सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर, रेडिओलॉजिस्ट,दवाखाने किंवा प्रयोगशाळांबाबत माहिती मिळाल्यास पुराव्यांसह समुचित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे.

**कायदा पुरेसा नाही,मानसिकता बदलणे गरजेचे आहे**

मुलींना जन्मालाच न घालण्याची मानसिकता समाजात खोलवर रुजलेली आहे.केवळ कायदा करून ही समस्या संपणार नाही.कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसोबतच स्त्रीविरोधी पुरुषप्रधान मानसिकता बदलणे,तसेच मुलींमध्ये निर्णयक्षमता,आत्मविश्वास आणि स्वावलंबन विकसित करणे आवश्यक आहे.मुलींचे शिक्षण, क्षमता विकास आणि संधींची उपलब्धता यावर आपला निधी व वेळ सकारात्मकरीत्या वापरणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**गर्भलिंग निदानाचे गंभीर सामाजिक परिणाम**

गर्भलिंग निदानामुळे निसर्गाचे संतुलन बिघडत असून समाजाचा नैतिक पाया ढासळत आहे.देशातील काही भागांत गेल्या १०-१५ वर्षांत मुलींचा जन्मच झालेला नाही,अशी भयावह स्थिती निर्माण झाली आहे. मुलींचा व्यापार,लैंगिक शोषण वाढत आहे.काही ठिकाणी मुलींना जनावरांसारखे विकत घेतले जाते. स्त्रियांवरील अत्याचार, हिंसाचार वाढण्याची शक्यता आहे. बहुपतीत्वाच्या प्रथा लादल्या जात आहेत. गुजरात,राजस्थान आणि महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत लग्नासाठी मुली न मिळाल्याने इतर राज्यांतून फसवणूक करून मुली आणल्या जात आहेत.

**का नकोशा वाटतात मुली**

मुलगा हाच वंशाचा दिवा आणि मुलगी परक्याचे धन ही मानसिकता आजही समाजात आहे.हुंडा पद्धतीचा भस्मासूर,मुलींवर केलेल्या खर्चाचा ''परतावा नाही'' असा गैरसमज,रुढी-परंपरा आणि पुरुषप्रधान संस्कृती या सर्व कारणांमुळे मुलींकडे दुर्लक्ष होते.

**सोनोग्राफी तंत्रज्ञानाचा गैरवापर :**

गर्भातील बाळाचे लिंग जाणून घेऊन मुलगी असल्यास गर्भपात करणे म्हणजे गर्भलिंग निवड. अल्ट्रासाउंड सोनोग्राफीचा या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाला.१९९१ ते २०११ च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार देशातील स्त्री-पुरुष प्रमाण झपाट्याने घटले आहे.

**गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान तंत्र कायदा काय सांगतो**

सन १९९४ साली देशभर लागू झालेल्या या कायद्यानुसार गर्भधारणेपूर्वी किंवा नंतर गर्भलिंग निवड व त्याची जाहिरात करण्यास बंदी आहे. कायद्याचा भंग करणाऱ्यांसाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे.पहिल्या गुन्ह्यासाठी संबंधित डॉक्टरला ३ वर्षांपर्यंत कैद,१० हजार रुपये दंड व मेडिकल कौन्सिलमधील नोंदणी निलंबन.

पुनरावृत्ती झाल्यास ५ वर्षांपर्यंत कैद,५० हजार रुपये दंड व कायमस्वरूपी नोंदणी रद्द.गर्भलिंग निवडीसाठी दबाव आणणाऱ्या व्यक्तीस ३ वर्षांपर्यंत कैद व ५० हजार रुपये दंड या कायद्याखाली गर्भवती महिला निर्दोष मानली जाते

**तक्रार कुठे करावी**

राज्य सरकारने नियुक्त केलेल्या जिल्हा किंवा तालुका स्तरावरील समुचित प्राधिकाऱ्यांकडे तक्रार करता येते.यासाठी www.amchimulgimaha.in. ही सार्वजनिक आरोग्य विभागाची वेबसाईट उपलब्ध असून,येथे नाव न सांगता तक्रार करता येते.तसेच टोल फ्री क्रमांक १८००-२३३-४४७५/ १०४ वरही संपर्क साधता येतो.

'बेटी बचाओबेटी पढाओ' अंतर्गत गावपातळीवरील उपक्रम,व्हिलेज हेल्थ प्लॅनमध्ये हा विषय समाविष्ट करून 'आकडे बोलतात' फलक, बालिका जन्मोत्सव,युवासंसद, गरोदर मातांसाठी शपथ कार्यक्रम, नवविवाहित दांपत्यांची शपथ,लेक लाडकी अभियान,महिला ग्रामसभा, जनजागृती फेऱ्या,एक मुलगी-एक झाड उपक्रम राबवता येतो.यामुळे समाजात स्त्री-पुरुष समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचतो. मुली आणि स्त्रियांना सन्मानाने जगता यावे,यासाठी सामाजिक परिवर्तन घडवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.गर्भलिंग निदानासारख्या अमानवी प्रथांना आळा घालण्यासाठी कायदा, प्रशासन आणि सजग नागरिक यांचा एकत्रित प्रयत्नच यशस्वी ठरू शकतो.लेक वाचली तरच समाज वाचेल, ही जाणीव प्रत्येकाच्या मनात रुजणे गरजेचे आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

**हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्धर विश्धनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित**

# सुनेत्रा पवार शपथविधी : पार्थ पवार अन् शरद पवारांच्या भेटीनंतर कुटुंबातील गैरसमज दूर झाले : किरण गुजर

**पुणे/प्रतिनिधी:** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आज उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. मात्र सकाळी ज्येष्ठ नेते पवार कुटुंबाचे प्रमुख शरद पवार यांनी मला याबाबतची कल्पना नसल्याचं सांगितलं आणि पवार कुटुंब अजूनही एक नसल्याची चर्चा सुरू झाली. पण तत्काळ अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी बारामतीतील गोविंदबाग इथं जाऊन शरद पवार आणि कुटुंबाची भेट घेतली. पार्थ पवार आणि शरद पवार यांच्यात तब्बल एक तास याबाबत चर्चा झाली. या बैठकीबाबत अजित पवार यांचे जवळचे नेते किरण गुजर यांनी प्रतिक्रिया देत ''एकमेकांच्या मनात जे गैरसमज होते तर दूर झाले आहेत,'' असं सांगितलं आहे. या भेटीदरम्यान सुप्रिया सुळे, रोहित पवार, युगेंद्र पवार उपस्थित होते, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.



याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अजित पवार यांचे विश्वासू किरण गुजर म्हणाले की, ''ही बैठक पूर्वनियोजित नव्हती. विद्या प्रतिष्ठान इथं अजित पवार यांचं स्मारक कुठं करायचं याबाबत चर्चा करण्यासाठी मी गेलो होतो. तिथं पवार कुटुंबीय एकत्र होते. नेमकं सकाळी शरद पवारांना शपथविधीबाबत माहिती नसल्याची बातमी आली. मी असा विचार केला की यामध्ये कुठेतरी कम्युनिकेशन गॅप पडत आहे. काल रात्रीपर्यंत अशी कोणाशीही चर्चा नव्हती. दादांचं निधन झाल्यानंतर पक्षाच्या वतीनं गट नेता निवड आणि इतर प्रक्रिया पार पाडायची असते. पक्षाच्या नेत्यांनी मुंबईच्या लेव्हलवर हा निर्णय घेऊन प्रक्रिया सुरू केली. लगेचच शपथविधी होणार आहे ही मीडियाच्या माध्यमातून जेव्हा बातमी आली, त्याच्या अनुषंगानं काही चर्चा झाली. वास्तविक पाहता हे शरद पवारांनाच नाही, तर कोणालाच माहीत नव्हतं. हे मीडियाच्या माध्यमातून कळालं. माझ्यासारख्याला असं वाटलं की यात काहीतरी घडतंय यात कम्युनिकेशन गॅप पडतोय आणि हा गॅप दूर होणं गरजेचं आहे. त्यानंतर पार्थ पवार हे त्या ठिकाणी आले आणि सर्व कुटुंबात चर्चा झाली. जे समज गैरसमज होते ते दूर झाले.''

दोन्ही पक्ष एक झाले पाहिजेत, ही दादांची अंतिम इच्छा आहे. हे मी बोलून देखील दाखवलं होतं, ती पूर्ण करण्याची प्रक्रिया हा सेकंड स्टेपचा भाग आहे. शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा वेगळा सब्जेक्ट आहे. हा निर्णय झाल्यावर पुढं कसं जायचं याचं देखील नियोजन झालेला असताना सगळे सकारात्मक असताना अशी चर्चा होताना कामा नये. यातून वेगळा संदेश जातो आणि एकमेकांच्या मनात जे समज गैरसमज होते, ते दूर झाले आहेत,'' असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू आहे, त्याबाबत गुजर यांना विचारलं असता ते म्हणाले, की ''दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील. १७ तारखेला बैठक झाल्यानंतर २१ तारखेला दादांनी मला याबाबत बोलून दाखवलं आणि हे मी सांगितलं आहे. पवार कुटुंबातील सर्वच घटकांची दादांची अंतिम इच्छा पूर्ण करण्याची तयारी असेल, तर हा प्रश्न निर्माणच होत नाही. याबाबतचा निर्णय आपल्या कौटुंबीक पातळीवरील जरी असला, तरी राज्य पातळीवरील पक्षाची नेते मंडळींनी बसून ती प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. निश्चितच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील.''

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांचा विलिनीकरणाला आक्षेप असल्याची चर्चा सुरू आहे. याबाबत गुजर यांना विचारलं असता ते म्हणाले की, ''कोणाचं काय मत आहे, काय नाही, विचारधारा काय आहे, कोणाला बाहेर पडायचं नाही, पडायचं हे दोन्ही मंडळी एकत्र बसून ठरवतील. दोन्हींनी एकत्र बसून ऑन टेबल बसून दादांची इच्छा आहे, ती पूर्ण करायची. जर पवार फॅमिलीची इच्छा असेल तर त्या अनुषंगानं राज्य नेतृत्व दोन्ही बाजूचं कसं नेतृत्व करायचं हे ठरेल. शरद पवार यांचीही ती इच्छा आहे,'' असं देखील यावेळी गुजर म्हणाले.

शरद पवार यांनी शपथविधी बाबतचं वक्तव्य केलं आहे. त्याबाबत गुजर यांना विचारलं असता ते म्हणाले की, ''तसं असतं तर पार्थ पवार हे मुंबईला गेले असते, ते इथं थांबलेत ना, आतापर्यंत इथं होते. हा खूप मोठा आघात झाला आहे. योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल. याच्यापूर्वी देशात अनेक राज्यात अशी वेळ जेव्हा आली, तेव्हा असे निर्णय त्वरित घेतले गेले. त्या अनुषंगानंच हा निर्णय आहे. त्यामुळे हा निर्णय अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्यांनी त्यांच्या पातळीवरून केलेला निर्णय आहे. दादांनी जे स्वप्न पाहिलं आहे ते पूर्ण करण्यासाठी पुढची सकारात्मक पावलं उचलली जातील, हा माझा विश्वास आहे. इंदिरा गांधी गेल्या तेव्हा राजीव गांधी यांना किती वेळात शपथ दिली गेली, तुम्ही याचा इतिहास काढून बघा. नंतर अधिवेशन सुरू होणार आहे, त्या पक्षाचा गटनेता नसेल, तर त्याच्या निवडीची प्रक्रिया करावी लागेल. राज्यपातळीच्या निर्णयावर काही निर्णय घेण्याची वेळ तिथल्या प्रमुखावर आली असेल, तर त्यानं तो घेतला. भावना सर्वांना आहेत. पवार कुटुंबाच्या भावनांशी त्या कुटुंबावर झालेल्या आघाताशी अद्याप कोणीही सावरलेला नाही. राजकीय कर्तव्य आणि आपली कर्तव्य आणि आपल्या भावना याची एकत्र सांगड घालता येणार नाही. शपथविधी नंतर सुनेत्रा पवार परत येतील. त्यांची मानसिक अवस्था मला माहीत आहे. त्या कोणत्या परिस्थितीतून जात आहेत. परंतु काही प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात, त्या जर या प्रक्रियेत सहभागी नसत्या तर त्या गेल्या नसत्या. त्या दादांच्या उत्तराधिकारी आहेत. पक्षाच्या राज्यस्तरीय नेत्यांनी जो निर्णय घेतला तो वहिनींनी त्यांच्यापर्यंत जाऊन पूर्ण करणं गरजेचं होतं म्हणून त्या गेल्या. रात्री काही मीटिंग होणार आहेत, त्यासाठी पार्थ पवार यांना तातडीनं मुंबईला जावं लागलं परंतु ते शपथविधीला गेलेले नाहीत, हे लक्षात ठेवा. सुनेत्रा पवार यांना घरातूनच राजकीय पार्श्वभूमी लाभली आहे. चाळीस-पंचेचाळीस वर्षाचा कालावधीत त्यांची राजकारणात गेली आहेत.''

## आलिया भट्ट सोशल मीडिया अकाऊंट डिलीट करणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्ट चित्रपटांसह वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते. ती आपल्या परिवारातील काही फोटो सोशल मीडियात शेअर करत असते. आलिया सोशल मीडियातही तितकीच सक्रीय असते. तिच्या बहुतांश पोस्टमध्ये आलिया रणबीर आणि मुलगी राहासोबत दिसते. आई झाल्यानंतर तिनं आपल्या करिअरमधून ब्रेक घेतला नाही. तिनं अविरत आपले कार्य सुरू ठेवले. तिच्या चित्रपटांना आणि अभिनयालाही प्रेक्षकांकडून पसंती मिळते. सध्या तिची मातृत्व आणि करिअरमध्ये तारेवरची कसरत सुरू आहे. अलिकडेच एका मुलाखतीतून तिनं मातृत्वाबद्दल उघड भाष्य केलं आहे. तसेच सोशल मीडिया अकाऊंट डिलीट करण्याचा विचार करत असल्याचंही तिनं सांगितलं.

एका मुलाखतीत आलिया भट्टला तिच्या मातृत्वाबद्दल विचारण्यात आले. मातृत्वाबद्दल अभिनेत्री म्हणाली, ''हे मोठे परिवर्तन आहे. जे नऊ महिन्यांत घडते. आपल्याला शरीर आणि मानसिकतेत बरेच बदल जाणवतात. पण जेव्हा पोटात वाढवलेलं नऊ महिन्यांचं मुल आपल्या आयुष्यात येतं, तेव्हा त्याचा इतका खोलवर परिणाम होतो, पूर्वीसारखे परत तसेच आयुष्य जगणे कठीण होते. जवळजवळ अशक्य होते'', असं अभिनेत्री म्हणाली. सध्या आलिया भट्ट लेक राहासोबत मातृत्व जगत आहे. सोशल मीडिया डिलिट करण्याच्या निर्णयावरून अभिनेत्री म्हणते, ''असे बऱ्याचदा होते, मी सकाळी उठते आणि सोशल मीडिया डिलीट करण्याचा विचार करते. मला अशी अभिनेत्री व्हायची आहे, जी फक्त आणि फक्त ॲक्टिंग करेल. मला या चर्चेत अडकून राहायचं नाही.

## डॉ.नागोराव कुंभार यांना डॉ. यशवंत सुमंत स्मृती जीवनगौरव पुरस्कार जाहीर;आज होणार वितरण

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील थोर विचारवंत,विचारशलाका त्रैमासिकाचे संपादक डॉ.नागोराव कुंभार यांना डॉ.यशवंत सुमंत स्मृती जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला असून, त्याचे वितरण रविवार,दि.१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी स.ब.सार्वजनिक जिल्हा ग्रंथालय सभागृह, वर्धा येथे होणार आहे.

ज्येष्ठ विचारवंत डॉ.भा.ल.भोळे व डॉ.यशवंत सुमंत यांच्या स्मृतीप्रित्यर्थ यशवंतराव दाते स्मृती संस्था आणि सुमंत परिवाराच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी विविध राज्यातील मान्यवरांना विविध पुरस्काराने सन्मानीत करण्यात येते.वर्ष २०२५ च्या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून,त्यात डॉ.नागोराव कुंभार यांना डॉ.यशवंत सुमंत स्मृती जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. पुणेच्या दीपक गायकवाड लिखित पेरियार -मिथक आणि वास्तव वैचारिक ग्रंथाला,डॉ.भा.ल.भोळे स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे.सामाजिक कार्यकर्त्या वृषाली मगदुम यांना डॉ.भा.ल.भोळे स्मृती सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार तसेच अभ्यासक डॉ.देवकुमार अहिरे यांची डॉ.यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधक प्रेरणा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

सदरील पुरस्काराचे वितरण सर्च संस्थेचे प्रमुख डॉ.अभय बंग यांच्या हस्ते होणार असून, या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार,विदर्भ साहित्य संघाचे व यशवंतराव दाते स्मृती संस्था वर्धाचे अध्यक्ष प्रदीप दाते यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सदरील कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन पुरस्कार निवड समितीचे निमंत्रक किशोर बेडकिहाळ,संयोजक डॉ.राजेंद्र मुंढे,सदस्य प्रा.हाशम शेख, संजय इंगळे तिगावकर, हिरण्मय भोळे आदिंनी केले आहे.

## शिराळा तालुक्यात बिबट्याचा हल्ला; चार वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू, ग्रामस्थांचा उद्रेक

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी:** शिराळा तालुक्यातील बिऊर गावात बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घरासमोर अंगणात खेळत असताना अचानक बिबट्याने मुलावर झडप घातली आणि त्याला ओढत सुमारे अर्धा ते पाऊण किलोमीटर अंतरावर नेले.

नागरिकांनी बिबट्याचा पाठलाग केल्याने बिबट्याने मुलाला सोडले; मात्र या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने मुलाचा मृत्यू झाला. मुलाचे पार्थिव शिराळा ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले आहे.

या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून वातावरण अत्यंत तणावपूर्ण झाले आहे. आई-वडिलांचा आक्रोश, नातेवाईकांचे अश्रू आणि गावकऱ्यांतील असह्य वेदना पाहून सर्वांचे मन हेलावून गेले आहे.

बिबट्याच्या सततच्या हल्ल्यांमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी शिराळा येथील वन विभागाच्या कार्यालयावर दगडफेक व तोडफोड केली. शिराळा उपजिल्हा रुग्णालयासमोरही नागरिकांनी मोठा उद्रेक केला. वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप करत दोषींवर कारवाई, संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन आणि तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली. तसेच वन विभागाचा वरिष्ठ अधिकारी येईपर्यंत



मुलाचे शवविच्छेदन करू नये, अशी भूमिका नागरिकांनी घेतली.


अखेर स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार सत्यजित देशमुख, उपविभागीय प्रांत अधिकारी अर्जुन श्रीवास्तव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अरुण पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन बिबट्याला पकडण्यासाठी तातडीचे उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. तसेच वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत चौकशी करण्यात येईल, असे सांगितल्याने नागरिक काहीसे शांत झाले.

## शब्दकोडे क्र. 73

१. झोपण्याची सोय ६. धमकी, दीर्घ श्वास ८. धमनी ९. भारताचे 'नन्हे' माजी पंतप्रधान १२. मनाची घालमेल १५. डळमळीत, अस्थिर १६. जाडसर पीठ १७. पायाचे थरथरणे १९. पूर्वी ही देखील पित २२. रुग्णालय २५. बंगाली रुपाया २७. युवक २९. अग्र, निमुळता भाग ३०. बालतरु ३१. डोंगरातील वाट ३२. हाडांचा सांगाडा ३४. भीषण (हास्य) ३५. दचकणे, चकित होणे ३६. उपस्थित ३८. व्रात्य, निरुद्योगी, भटक्या ३९. हालचालीवर ठेवलेली नजर ४०. उद्याच्या नंतरचा दिवस ४१. वात्रट ४३. शिव्याशाप ४५. निद्रा, झोप ४७. पांढरपेशा ५२. कान, अंगराज ५४. चर्चा ५५. नशीब, दैव (इंग्रजी) ५७. घर ५९. मस्ती, गर्व ६०. हिमत, धैर्य ६२. लखलख, अभ्रकाचा चुरा ६५. बाई ६६. साखरेची फुगीर वडी ६८. सोने ६९. पूर्वज ७१. ठिबकणारा, गळणारा ७२. माफी मागणारा ७४. वनस्पतीजन्य रत्न ७५. कपाळ ७६. मगर ७७. वर-वधूची मिरवणूक ७९. तिघांमध्ये ८१. वजन, बोजा ८२. तारणारा ८३. निगरगट्ट, व्रात्य ८४. प्रत्येक (टप्प्यावर)

उभे शब्द

१. पहाट होण्यापूर्वी हा सर्वाधिक घनगर्द असतो २. 'हा --- सोड सखे, पुरे हा बहाणा' ३. घट्ट विणीचे, गंभीर ४. रशिया (हिंदी) ५. केस काळे करण्याचे साधन ६. किंमत ७. दिवटी, उजेडाचे साधन ९. ढापणे, लुबाडणे १०. रखेली, दासी ११. भीक मागणे १३. तंट्यातील मध्यस्थ १४. स्त्री, बाई १५. फसवा राग-लोभ १८. नखरेल चाल २०. गार वाऱ्याची झुळूक १८. नखरेल चाल २०. गार वाऱ्याची झुळूक २१. माहीतगार २३. गोलाकार २४. पूर्ण जळणे २६. सडसडीत २८. आधी 'चोर' लावल्यास चोरांपासून सुरक्षित ३०. रोख रक्कम ३१अ. थाप, वावडी ३३. पाढे, पाठाची उजळणी ३४. च्या शिवाय ३५. ढीग, चवड ३७. लावणीतील तारुण्य ४०. झटकन ४२. रायगडावरील कडा ४४. शोध ४६. वेगाने ४८. आवड ४९. ही पैशानेच मोजता येते असे नाही ५०. नेहमी ५१. दिल्लीचे विमानतळ ५३. तपस्या ५६. वैतागवाणी बडबड, किरकिर ५८. करुणा, कीव ६१. मनाचा थकवा ६३. दुसऱ्याचे मनातील भाव ओळखणारा ६४. पश्चाताप ६६. खादाड राक्षस ६७. अक्षर ओळख ६९. बुवामहाराज ७०. दूरदेशी वास्तव्य ७३. मागणारा ७४. फरक, तफावत ७५. शपथ ७८. कौसल्यापुत्र ८०. छंद, व्यसन



### शब्दकोडे क्र. 72 चे उत्तर

आडवे उत्तर

१.दुर्जन ४.सामदामदंडभेद १०.जवळजवळ ११.गट १२.सारा १३.डबर १५.काका १६.लगाम १७.गरम १९.माळकरी २०.सारंग २१.नवरस २४.सरा २५.याग २६.नरमगरम २८.अनाथाश्रम २९.बकबक ३१.नाद ३२.जगन्नाथ ३३.कली ३४.ताई ३५.साल ३६.भकास ३८.कानशील ४०.बादल ४२.राम ४३.कळप ४४.अवसान ४६.शाल ४७.डबल ४९.लवाद ५१.तरस ५३.चोर ५४.चाकर ५६.यान ५९.उपकार ६०.लवाजमा ६३.वतनवाडी ६६.मालदार ६७.लस ६९.महाकाय ७१.साहस ७२.महासागर ७३.चरखा ७४.वरवर

उभे उत्तर

१.दुपेड २.नजर ३.खळबळजनक ४.सावकारी ५.मळका ६.मजलदरमजल ७.डगमग ८.भेट ९.आराम हराम १२.सार १४.बजरंगबली २०.साया २१.नगद २२.वर २३.अनाथ २४.सश्रम कारावास २७.मनाई २८.अन्नान्नदशा ३०.बस्तान ३३.कलकलाट ३४.ताल ३५.सालोसाल ३७.सम ३८.कापडचोपड ३९.शीतल ४१.ललत ४४.अनाकलनीय ४५.नवा ४८.बरका ५०.दया ५२.रतन ५५.रवा ५७.नवरदेव ५८.ताडी ६१.जमादार ६२.माल ६४.वार्ताहर ६५.तलम ६८.सहा ६९.मग ७०.हार ७१.साव

# गुजरातला जाणारा ४० लाखांचा विदेशी मद्यसाठा जप्त

## धुळे स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात आणून पुढे गुजरात राज्याकडे अवैध रित्या नेला जाणारा विदेशी दारूचा मोठा साठा धुळे स्थानिक गुन्हे शाखेने () पकडला आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ४० लाख ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

जळगावकडून धुळ्यामार्गे गुजरात राज्यात एका कंटेनर मधून विदेशी दारूची अवैध वाहतूक होत असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी धुळे शहरातील नवीन सिव्हिल हॉस्पिटल समोर, धुळे-जळगाव बायपास हायवेवर सापळा रचला. संशयास्पद टाटा कंपनीचा कंटेनर (क्रमांक आर. जे. ५२/ जी. ए. ३६३०) तिथे आला असता पोलिसांनी तो अडवला. यावेळी कंटेनर चालक अजय राजाराम वानखेडे (वय ५२, रा. इंदोर, मध्य प्रदेश) याच्याकडे चौकशी केली असता, त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली व कंटेनरमध्ये 'स्पेअर पार्ट्स' असल्याचे सांगितले.

मात्र, पोलिसांनी संशय बळावल्याने पंचांसमक्ष कंटेनरची तपासणी केली. त्यावेळी आतमध्ये 'किंगफिशर एक्स्ट्रा स्ट्रॉन्ग प्रीमियम बिअर'चे तब्बल ४०० बॉक्स आढळून आले. या दारूची विक्री फक्त मध्य प्रदेश राज्या पुरती मर्यादित असताना तिची अवैध वाहतूक केली जात होती. या कारवाईत पोलिसांनी १५ लाख ३६ हजार रुपये किमतीचे बिअरचे बॉक्स, २५ लाख रुपये किमतीचा टाटा कंपनीचा कंटेनर आणि ३ हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण ४० लाख ३९ हजार



रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## वृत्तविशेष...

### समृद्धी महामार्गावर अपघात, चालकाला डुलकी लागल्याने ट्रक पलटी; चालक किरकोळ जखमी





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** समृद्धी महामार्गावर अपघाताचा सत्र चालूच असून डोणगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत, समृद्धी महामार्गावरील पॅनल क्रमांक २६८, नागपूर कॉरिडॉरवर मुंबईहून नागपूरकडे जाणारा ट्रक चालकाला झोपेची डुलकी लागल्याने पलटी झाला आहे. घडलेल्या या अपघातात ट्रक क्रमांक २३ ६४१७ महामार्गावरून थेट रस्त्याखाली कोसळला. या अपघातात ट्रक चालक सुनील कुमार मोरया हा किरकोळ जखमी झाला असून त्याला तत्काळ उपचारासाठी मेहकर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि डोणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. चालक आणि वाहकाला ट्रकमधून सुरक्षित बाहेर काढण्यात आले. ट्रकमध्ये बारधाना भरलेला होता. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त ठेवला असून पुढील तपास सुरू आहे.

### सहा मुलांना कुत्र्याचा चावा; भटक्या कुत्र्यांची दहशत, नगर परिषदेचे दुर्लक्ष..

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा शहरात भटक्या कुत्र्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, एकाच दिवशी सहा लहान मुलांवर हल्ला करून त्यांना जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पालिकेच्या ढिसाळ कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे.



विविध भागांत भटक्या कुत्र्यांचे कळप फिरत असून, या झुंडींनी अचानक लहान मुलांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. जखमी झालेल्या सहा मुलांमध्ये कुणाच्या डोक्याला, कुणाच्या हाताला तर कुणाच्या पायाला कुत्र्यांनी गंभीर जखमा केल्या आहेत. जखमी मुलांना तातडीने उपचारासाठी बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.. गेल्या काही दिवसांपासून कुत्र्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. हे कुत्रे केवळ गल्लीबोळातच नव्हे, तर मुख्य रस्त्यांवरही झुंडीने फिरत आहेत. लहान मुले खेळण्यासाठी बाहेर पडली की हे कुत्रे त्यांच्यावर तुटून पडत असल्यामुळे ''मुलांना बाहेर पाठवायचे कसे?'' असा प्रश्न पालकांसमोर उभा ठाकला आहे..''शहरात कुत्र्यांची दहशत इतकी वाढली आहे की, आता घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे..पालिकेने याकडे गांभीर्याने पाहून तत्काळ बंदोबस्त करावा,अशी मांगणी करण्यात येत आहे.

### चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती मधील २८ आडत व्यापाऱ्यांची परवाने निलंबित

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती मधील २८ अडत व्यापाऱ्यांची परवाने निलंबित केले . निलंबित केलेले अडत व्यापाऱ्यांनी बाजार समिती सोडून बाहेर शेतकऱ्याचा शेत माल घेणे सुरू केलेले आहे .. त्यामुळे बाजार समितीचे गेल्या सात ते आठ वर्षापासून कोट्यवधी रूपयांचे नुकसान झाले आहे .. परिणामी बाजार समिती मधील हमाल, मापारी यांचेवर उपासमारीची वेळ आलीय, शिवाय कर्मचाऱ्याचे पगार ही वेळेवर होत नाही .. तर २८ अडत व्यापाऱ्यांचे परवाने निलंबित करून ही काही फरक पडत नसल्याने आता बाजार समिती काय निर्णय घेते, याकडे लक्ष लागले आहे .



### बालेवाडी येथील नियोजित महाराष्ट्र ऑलिम्पिक भवनला अजित पवार यांचे नाव देण्याची राज्य शासनाकडे मागणी

**पुणे/प्रतिनिधी** : पुण्यातील बालेवाडी-म्हाळुंगे येथे शिवछत्रपती क्रीडा नगरीत उभारण्यात येत असलेल्या नियोजित महाराष्ट्र ऑलिम्पिक भवनला महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे दिवंगत अध्यक्ष माजी उपमुख्यमंत्री कै. अजित पवार यांचे नाव देऊन क्रीडा क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची स्मृति कायम राखावी अशी मागणी पुणे हौशी ॲथलेटिक संघटनेचे अध्यक्ष ॲडवोकेट अभय छाजेड यांनी आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे पत्राद्वारे केली.

तसेच देशात मॅरेथॉन क्रीडा संस्कृतीची पायाभरणी करणाऱ्या भारतीय ऑलिंपिक महासंघाचे माजी अध्यक्ष सुरेश कलमाडी यांची स्मृती जतन करण्यासाठी पुण्यात दरवर्षी होणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन यापुढे कै. सुरेश कलमाडी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा म्हणून ओळखली जाईल असे पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ट्रस्टचे विश्वस्त म्हणून ॲडवोकेट अभय छाजेड यांनी जाहीर केले.

# सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी व अडचणींचे निरसन करण्यासाठी सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आले आहे.

अर्जदारांनी अर्ज करतांना स्विकृतीचे निकष : अर्ज विहित नमुन्यात केलेला असावा, तक्रार किंवा निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी, चारही स्तरांवरील लोकशाही दिनाकरीता अर्जदाराने अर्ज विहित नमून्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील, तालुका लोकशाही दिनानंतर एका माहिन्यांने जिल्हाधिकारी लोकशाही दिनात अर्ज करता येईल, जिल्हाधिकारी लोकशाही दिनानंतर दोन माहिन्यांनी विभागीय आयुक्त लोकशाही दिनात व विभागीय आयुक्त लोकशाही दिनानंतर दोन महिन्यांनी मंत्रालय लोकशाही दिनात अर्ज सादर करता येईल.

'हे' अर्ज स्विकारले जाणार नाहीत : न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल्स, सेवा व आस्थापना विषयक बाबी, विहीत नमून्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणांत पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तीक स्वरुपाची नसेल तर, वरील प्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनाकरीता स्विकृत करता येऊ शकत नाहीत असे अर्ज सामान्य तक्रार या स्वरुपात संबंधित विभागांकडे आवश्यक कारवाईसाठी पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी दिली आहे.

**महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन**

शासन निर्णयानुसार दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने फेब्रुवारी महिन्याचा महिला लोकशाही दिन महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येणार आहे.

# बुलढाण्यात रस्ता सुरक्षा सप्ताहाचा मोटारसायकल रॅलीने समारोप; रस्ते वाहतूक नियमांचे केली जनजागृती





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी रोखण्यासाठी व नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रम रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त घेण्यात आले. आज या सप्ताहाचा मोटारसायकल रॅली ने समारोप करण्यात आला..

या रॅली मध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या सह शहर पोलीस स्टेशन व वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी आणि शहरातील महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते.. वाहतूक नियम पाळा-सुरक्षित जीवन जगा'' असा संदेश देत ही रॅली शहरातील मुख्य मार्गावरून काढण्यात आली.

रॅलीदरम्यान दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, चारचाकी वाहनचालकांनी सीटबेल्ट लावावा, मद्यपान करून वाहन चालवू नये, वेगमर्यादा पाळावी तसेच वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळावा, अशा महत्त्वाच्या सूचना व नियमांची जनजागृती करण्यात आली आहे..

### अवकाळी पावसात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे – पालकमंत्री पाटील

**जळगाव/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या माध्यमातून नियमानुसार मदत दिली जाईल. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या असून शासन त्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे आहे. प्रत्येक पात्र शेतकऱ्याला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे, असे जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना सांगितले.

गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्र्यांनी आज धरणगाव तालुक्यातील बोरगाव बुद्रुक, गारखेडा, पष्टाने बुद्रुक तसेच जळगाव तालुक्यातील करंज, धानोरा व धाडी या गावांमधील नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान संबंधित गावांमध्ये शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी पालकमंत्री म्हणाले की, ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे त्यांनी आपली नावे तलाठी कार्यालयात नोंदवावीत. त्यानंतर संबंधित ठिकाणी पंचनामे करण्यात येऊन त्यांची यादी ग्रामपंचायत कार्यालयात प्रसिद्ध करण्यात यावी, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देवून अनेक भागांमध्ये विजेचे खांब कोसळून वीजपुरवठा खंडित झाला असून, तुटलेल्या वीज तारा व खांबांची तात्काळ दुरुस्ती करण्याचे आदेश महावितरण अधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या समस्या व निवेदने पालकमंत्र्यांकडे सादर केली. पाहणी दौऱ्यादरम्यान पालकमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला न्याय मिळवून दिला जाईल, असे आश्वासन दिले.

# प्रशासकीय विभागांनी सुरक्षिततेची सर्वतोपरी दक्षता घ्यावी – विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम

**नाशिक/प्रतिनिधी** : मालसाणे, ता. चांदवड येथे होणाऱ्या णमोकार महोत्सवासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी सुरक्षिततेची सर्वतोपरी दक्षता बाळगावी, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी आज सकाळी णमोकार तीर्थ येथे भेट देत पाहणी केली. त्यानंतर त्यांनी आढावा बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश ठाकूर, उपविभागीय अधिकारी कैलास कडलग, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळू पाटील, चांदवडचे माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले, की णमोकार महोत्सवासाठी मोठ्या संख्येने भाविक येतील. त्यांच्यासाठी शासनस्तरावरून आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. महोत्सव सुरू होण्यापूर्वी त्यांची चाचणी करून घ्यावी. महोत्सव परिसरात नियमितपणे स्वच्छता राहील याची दक्षता घ्यावी. घनकचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. अग्नी प्रतिबंधक उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असेही आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी णमोकार तीर्थ येथे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. तत्पूर्वी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी हेलिपॅड, वाहनतळ, मुख्य मंडप, पाणीपुरवठा व स्वच्छता आदी कामांची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी णमोकार तीर्थ समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जीवन अनमोल आहे, वाहने हळू चालवा : एसडीपीओ संतोष खाडे

## मेहकर पोलीस विभागातर्फे रस्ता सुरक्षा सप्ताह जनजागृती रॅली

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : जीवन हे अनमोल आहे. प्रत्येकाने स्वतःच्या व इतरांच्या जीवाची काळजी घ्यावी. वाहने हळू चालवावीत व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे,'' असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांनी केले. बुलढाणा पोलीस विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या रस्ता सुरक्षा सप्ताह जनजागृती अभियानाच्या पार्श्वभूमीवर मेहकर पोलीस विभाग व मेहकर पोलीस उपविभागाच्या वतीने दि. ३१ जानेवारी रोजी मेहकर शहरात दुचाकी रॅली काढून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

यावेळी बोलताना एसडीपीओ संतोष खाडे म्हणाले की, अलीकडच्या काळात दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे वाहन चालविताना वेग मर्यादेत ठेवणे, हेल्मेटचा वापर करणे, अल्पवयीन मुलांच्या हाती वाहने न देणे, तसेच वाहनाचे संपूर्ण कागदपत्रे व वाहन चालविण्याचा परवाना जवळ ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. वाहतूक पोलिसांकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असेही त्यांनी सांगितले.

या जनजागृती रॅलीत मेहकरचे पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार यांच्यासह सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. सदर रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक, तहसील चौक, मुख्य बाजारपेठ, सावजी गल्ली, लोणार वेस, राजमाता जिजाऊ चौक, नागसेन चौक, शिक्षक कॉलनी, डोणगाव रोड,





डीपी रोड, शिवाजीनगर व बस स्थानक रोड या मार्गाने काढण्यात आली. या रॅलीद्वारे वाहनधारकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत रस्ता सुरक्षेबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली.